# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**
phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com

## <u>प्रेसनोट क्र.६९६ दिनांक ०९.०९.२०२०</u>

**<u>१. वालीव पोलीस ठाणे गुन्हा.रजि.क्र.I ७३४/२०२० भा. द. वि. सं. कलम ३९७,३४ प्रमाणे.</u>**

फिर्यादी पुरुष वय ४८ वर्षे, व्यवसाय-नोकरी, रा.पोलीस स्टेशन जवळ, भाईंदर वेस्ट, ठाणे, यांनी फिर्याद दिली की, दि.०८/०९/२०२० रोजी फिर्यादी हे सकाळी ०५.४५ वा. ते ६.३० वाजताचे दरम्यान अज्ञात स्विफ्ट डिझायर गाडीमधील ३ अनोळखी इसम वय अंदाजे २५ ते ३० वर्षे भाषा हिंदी बोलणारे यांनी फिर्यादीस कुठे जायचे आहे असे विचारुन गाडीत बसवुन काही अंतर पुढे नेवुन गाडीत पुढच्या सिटवर व मागच्या सिटवर बसलेल्या इसमाने फिर्यादी यास चाकुचा धाक दाखवुन १)१०,०००/- रोख रक्कम २) ५०,०००/- रुपये किंमतीची २० ग्रॅम वजनाची सोन्याची चैन ३) २१०००/- रुपये किंमतीची ७ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी ४)५०००/-रुपये किंमतीचा रियलमी कंपनीचा मोबाईल, आय.डि.बी.आय.बँकेचे एटिएम कार्ड, पॅनकार्ड, आधारकार्ड, मतदारकार्ड, कंपनी आयडीकार्ड, ब्लॅक कलरची ऑफिसची बॅग असा एकुण ८६,००० /- रुपये किंमतीच्या वस्तु फिर्यादी कडुन बळजबरीने घेऊन फिर्यादीयास चिंचोटी फाटयाच्या पुढे गुजरात बाजुकडे चढणावर जंगलात गाडीतुन खाली धक्का देऊन पळुन गेले म्हणुन त्यांचे विरुध्द गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

पालघर जिल्हयातील सर्व नागरीकांना पालघर पोलीस दलाकडुन आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारच्या जबरी चोरीच्या घटना मोठया प्रमाणात घडत असुन बाहेर फिरताना अनोळखी व्यक्तीच्या खाजगी गाडीमध्ये बसुन प्रवास करु नये.

**<u>२. वालीव पोलीस ठाणे गु.रजि.क्र. I ७३३/२०२० भा.द.वि.सं. कलम ३०४(अ),२७९,३३७,३३८, सह मोवाका कलम-१८४,१८७ प्रमाणे.</u>**

फिर्यादी पुरुष वय २९ वर्षे, व्यावसाय-नोकरी, रा.भिवंडी, जि.ठाणे, यांनी फिर्याद दिली की दि.०७/०९/२०२० रोजी रात्री ११:०० वा.चे पुर्वी भिवंडी वाहीनीवर एच.पी.पेट्रोलपंप समोर, वसई पुर्व ता.वसई जि.पालघर, येथे यातील फिर्यादी यांचा मयतभाऊ इफतेखार हा त्याचे मित्राची मोटार सायकल क्रमांक एम.एच.०४.जे.डब्ल्यु.३३०३ हि घेवुन चिंचोटी बाजु कडुन भिवंडी बाजु कडे जात असतांना भिवंडी वाहीनीवर एच.पी.पेट्रोलपंप समोर अज्ञात वाहन चालकाने आपल्या ताब्यातील वाहन रहदारीच्या नियमांकडे दुर्लक्ष करुन अविचाराने व हयगयीने भरधाव वेगात चालवुन फिर्यादी यांचा मयतभाऊ इफतेखार नियाज अहमद आन्सारी, वय-२६ वर्षे, यास टोकर मारुन अपघात करुन अपघातामध्ये त्याचे डोक्यावरुन अज्ञात वाहनाचे चाक गेले असुन त्याचे दोन्ही हात व उजवा पाय फॅक्चर होवुन गंभीर स्वरुपाच्या दुखापती होवुन त्याचे मरणास कारणीभुत झाला आहे म्हणुन गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

पालघर जिल्हयातील सर्व नागरीकांना पालघर पोलीस दलाकडुन आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारच्या वाहन अपघाताच्या घटना मोठया प्रमाणात घडत असुन वाहन चालवितांना वाहतुकीच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करुन सावकाश वाहने चालवावे ही विनंती.

Scanned with CamScanner